सोमवार, दि. ४ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३५८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जालन्यात अनधिकृत बांधकामावर कारवाई

## परवानगीपेक्षा अधिकचे बांधकाम करणाऱ्या प्रतिष्ठित व्यापाऱ्यांवर गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी -** एकीकडे जालना महानगरपालिकेकडून शहरात अतिक्रमण मोहीम वेगाने सुरू आहे. शहरातील रस्ते मोकळे करण्यात येत आहेत आणि विकास आराखड्यानुसार रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी पाच, दहा, बारा मीटरपर्यंतची अनेक बांधकामे निष्कासित केली जात आहेत. मात्र दुसरीकडे, शहरातील काही प्रतिष्ठित व्यापारी रीतसर बांधकाम परवानगी घेऊनही परवानगीपेक्षा जास्त बांधकाम करून रस्ते लहान करत असल्याचे चित्र सध्या जालना शहरात दिसत आहे. या पार्श्वभूमीवर, जालना शहरात अनधिकृत बांधकांवर कारवाईची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

शहरातील मंगळ बाजार भागात बांधकाम परवानगीपेक्षा जास्त बांधकाम केल्याचे महानगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक अशोक लोंढे यांनी बांधकामस्थळी जाऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अहवाल सादर केला. या तपासणी अहवालावरून वंदना जगदीश प्रिथ्यानी, जगदीश केवलराम प्रिथ्यानी, अनिकेत जगदीश प्रिथ्यानी यांच्या विरोधात अनधिकृत बांधकाम निरीक्षक भाऊलाल राठोड यांच्या फिर्यादीवरून रविवार (दि ३) रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तक्रार आणि तपासणीचा तपशील:**
तक्रारदार शकील हुसेन शेख (रा. गांधीनगर, जालना) यांनी २४ मार्च २०२५ रोजी महानगरपालिका कार्यालय, जालना येथे निवेदनाद्वारे तक्रार दिली होती. त्या अनुषंगाने व कार्यालयीन आदेश क्र. जा. ज. न. प्र./नविप/२०२५/३५६ दिनांक २३.०५.२०२५ नुसार प्रत्यक्ष स्थळपाहणी निरीक्षक अशोक के. लोंढे, काद्राबाद यांनी जायमोक्यावर जाऊन तपासणी केली होती.

**तपासणी अहवालानुसार आढळलेले अनधिकृत बांधकाम:**
तपासणी अहवालानुसार, न.भू.क्र. ४४०४, ४४०५, ४४०६ या ठिकाणी अनधिकृत बांधकाम आढळले आहे. बांधकामाचे तपशील पुढील प्रमाणे आहे यात पुढील बॉर्डर: ४.६० मी. द ५.४० मी., मागील बाजू: ४.१२ मी. द ४७.८५ मी., पूर्व बॉर्डर: १.८९ मी. द २२.२५ मी., पश्चिम बॉर्डर: ४.५९ मी. द २२.२५ मी. समावेश आहे. तसेच २८.३५ मी. द ८.५३ मी. या क्षेत्रफळामध्ये अनधिकृत स्लॅब टाकून तसेच सामासिक अंतरामध्ये बांधकाम परवानगीपेक्षा जास्त बांधकाम, विटा सिमेंट रेती खडी सर्व्हिस मध्ये बांधकाम परवानगीपेक्षा जास्त बांधकाम केले असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

या अनधिकृत बांधकामाबाबत तपासणी अहवालानुसार, त्यांनी अतिरिक्त जागेतही बांधकाम केले आहे व त्यांनी शासनाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केले आहे. यामुळे त्यांच्याविरुद्ध कलम २२३ भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे कायदेशीर फिर्याद दाखल केली आहे.

या घटनेमुळे जालन्यातील




अनधिकृत बांधकामांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. श्री प्रिथ्यानी हे जालना शहरातील प्रतिष्ठित सोन्या चांदीचे व्यापारी असल्याने अन्य व्यापाऱ्यांनी बांधकाम परवानगीपेक्षा अधिकचे बांधकाम केले असल्याच्या शक्यतेला बळ मिळाले आहे.

शहरात विविध ठिकाणी बांधकाम परवानगी पेक्षा अधिकची कामे झाल्याचे अथवा होत असल्याचे मनपाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना दिसून येत नाही का? केवळ तक्रार मिळाल्यानंतर महानगर पालिका कारवाई करणार का? असे असेल तर मनपाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना काय कार्यालयात गोट्या खेळण्यासाठी शासन पगार देते काय? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेतून विचारला जात आहे.

## ऑनलाइन गेमिंग आणि जुगार ॲप्सवर सर्वोच्च न्यायालयाची गंभीर दखल

### जुगार ॲप्सवर कठोर होणार कारवाई - ॲड. धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** देशात दिवसेंदिवस फोफावत असलेल्या ऑनलाइन गेमिंग आणि जुगार ॲप्सवर आता सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. भारतीय सांस्कृतिक मूल्यांवर मोठ्या प्रमाणात घाला घालणाऱ्या या उद्योगावर कठोर कारवाईचे संकेत देत, न्यायालयाने देशातील सर्व राज्य सरकारांना, रिझर्व्ह बँक, अंमलबजावणी संचालनालय, भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण, गुगल इंडिया, ॲपल इंडिया (Apple India) तसेच ड्रीम ११, MPL १२३ Games यांसारख्या प्रमुख ऑनलाइन गेमिंग कंपन्यांना नोटिसा बजावल्या आहेत. या सर्व घटकांकडून न्यायालयाने या गंभीर विषयावर स्पष्टीकरण मागवले आहे. भारतीय सांस्कृतिक मूल्यांवर घाला घालणाऱ्या या ऑनलाइन गेमिंग व जुगाराच्या उद्योगावर आता कठोर कारवाईच होईल, असे ठाम मत ॲड. अश्विनी महेश धन्नावत यांनी व्यक्त केले आहे. ही कारवाई केवळ कायदेशीर चौकशीपुरती मर्यादित नसून, आर्थिक गुन्ह्यांप्रमाणेच ईडी व सायबर पोलिस संयुक्त मोहीम उघडणार असल्याचे संकेत मिळाल्याचे त्या म्हणाल्या.

यासंदर्भात अधिक माहिती देताना ॲड. धन्नावत यांनी सांगितले की, ऑनलाइन गेमिंग व जुगार चालविणाऱ्या ॲप्सवर बंदीसाठी आपण वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. तसेच कोरोना काळात ॲड. महेश धन्नावत यांच्या माध्यमातून तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना ही बाब ई-मेलद्वारे निदर्शनास आणून देण्यात आली होती. कोविडमुळे शिक्षण प्रणाली ही मोबाईल व इंटनेटवर अवलंबुन झालेली असल्याने शाळकरी मुलांच्या हातात मोबाईल व इंटरनेट सेवा आलेली आहे. तसेच अनेक वृत्तपत्र व सोशल मिडीयावर प्रसिद्ध अभिनेत्यांच्या माध्यमातून ऑनलाईन गेम्सची प्रसिद्धी केली जात असल्यामुळे अनेक बेरोजगार युवक तथा लहान मुले त्याची शिकार होत आहे, कारण या गेम्सद्वारे पैसे कमविले जाऊ शकते, अशा जाहिराती प्रसिद्ध होत असल्याकडे लक्ष वेधले होते, असे स्पष्ट करून ॲड. अश्विनी धन्नावत म्हणाल्या की, भारतात ही जुगारी ॲप्स म्हणजे मानसिक, नैतिक आणि आर्थिक गुलामीचे साधन बनत चालले असून, याला वेळेत अटकाव घालणे आवश्यक आहे. ड्रीम ११, एमपीएल, १२३ यांसारख्या ॲप्समुळे लाखो तरुण व्यसनाधीन झाले असून, त्यांचे शैक्षणिक व वैयक्तिक आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. हे केवळ ॲप्स नाहीत, तर हे समाजघातक डिजिटल




जुगार केंद्र आहेत. यामुळे तरुणाई आर्थिक गर्तेत अडकत असून, आत्महत्यांचे प्रमाणही वाढत आहे. न्यायालयाने गंभीर दखल घेत नोटिसा बजावल्या ही समाधानकारक बाब आहे. अशा ॲप्सवर केंद्र सरकारने त्वरित बंदी आणावी, त्यांच्या जाहिराती, डाउनलोड सुलभता, पेमेंट गेटवे व्यवहार थांबवावेत व गुन्हे नोंदवावेत, यासाठी आता आपणदेखील याचिकेच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात पाठपुरावा करणार पान २ वर

**युवा आदर्श**

**गरम ...**

लफडे पडले बाहेर
अधिवेशन ते गरम
भले भले पैलवान
पडे अचानक नरम
ऐन वेळी अडचणी
आणते काही करम
होत्याचे करे नव्हते
विचीत्र असते शरम
हळूचं का पावादोरा
सिमा गाठता चरम
परत फिरणे कठीण
आडवे इमान धरम
ऐन तारुण्यात करे
धरलेवान प्रस्थाश्रम
लफडे बाहेर आणले
घेतलेत अमाप श्रम
बड्या बड्या धेंडाचे
नाकांत आणला दम
स्पर्धा करे जीव अर्धा
हम किसीसे ना कम
जरीसरले अधिवेशन
संपलाच नसे संभ्रम
काय पडले पदरांमधे
वाजत राहते पडघम

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### छत्रपती संभाजीनगर-परभणी रेल्वेमार्ग दुहेरीकरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

## २१७९ कोटींचा प्रकल्प; डॉ. कल्याण काळे यांच्या पाठपुराव्याचे यश

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय आर्थिक व्यवहार समितीने रेल्वे मंत्रालयाच्या चार महत्त्वाच्या बहु-मार्गिकरण प्रकल्पांना नुकतीच मंजुरी दिली आहे. यामध्ये मराठवाड्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद)-परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचा (Doubling) समावेश करण्यात आला आहे. सुमारे १८७.२९ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पासाठी २१७९ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, हा प्रकल्प २०२८-२९ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. देशाच्या ११,१६९ कोटींच्या बहु-मार्गिकरण योजनेचा हा एक महत्त्वाचा भाग आहे.

**मराठवाड्याच्या विकासाला गती:**
केंद्रीय मंत्रिमंडळाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यांतील रेल्वे संपर्कात आमूलाग्र बदल होणार आहे. हा प्रकल्प खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या दृढ इच्छाशक्ती, लोकहिताशी असलेली बांधिलकी आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा ठोस परिणाम मानला जात आहे. डॉ. काळे यांनी या मार्गाच्या दुहेरीकरणासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे वेळोवेळी ठोस मांडणी करून केंद्र सरकारच्या धोरणात्मक योजनेत ही मागणी समाविष्ट करून घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

**देशव्यापी बहु-मार्गिकरण योजनेंतर्गत मंजूर झालेले चार प्रमुख प्रकल्प:**
१. इटारसी-नागपूर चौथी लाईन, २. छत्रपती संभाजीनगर-परभणी दुहेरीकरण (Doubling), ३. आलुबाडी रोड-न्यू जलपाईगुडी तिसरी व चौथी लाईन, ४. डांगोअपोसी-जारोली तिसरी व चौथी लाईन या चार प्रकल्पांमुळे देशातील १३ जिल्ह्यांतील रेल्वे नेटवर्क सुमारे ५७४ किलोमीटरने वाढणार आहे. यामुळे २,३०९ गावांतील सुमारे ४३.६० लाख लोकसंख्येला थेट लाभ मिळणार आहे.



**प्रकल्पाचे बहुआयामी फायदे:**
या रेल्वेमार्ग दुहेरीकरणामुळे अनेक महत्त्वपूर्ण फायदे अपेक्षित आहेत: मालवाहतुकीत क्रांती: कोळसा, सिमेंट, कृषी उत्पादन, कंटेनर, पेट्रोलियम यांसारख्या मालाच्या वाहतुकीत मोठी क्रांती घडेल. अतिरिक्त क्षमता: दरवर्षी ९५.९१ दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक क्षमता निर्माण होईल.

**रोजगारनिर्मिती:** या प्रकल्पांमुळे २२९ लाख मानव-दिवसांचे प्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील.

**पर्यावरणीय लाभ:** तेल आयातीत १६ कोटी लिटर घट होईल, ज्यामुळे उत्सर्जनात ५१५ कोटी पान २ वर

## जालना गणेश फेस्टिवलच्या अध्यक्षपदी अशोकराव आगलावे यांची निवड; यंदाही दणदणीत उत्सवाचे आश्वासन



**जालना । प्रतिनिधी -** जालना गणेश फेस्टिवलच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त उप कार्यकारी अभियंता अशोकराव आगलावे यांची आज (रविवार, ३ ऑगस्ट २०२५ रोजी) सर्वानुमते निवड करण्यात आली. यंदाचा गणेश फेस्टिवलही सर्वांच्या सहकार्याने दणदणीत साजरा करू, अशी ग्वाही नूतन अध्यक्ष अशोकराव आगलावे यांनी याप्रसंगी बोलताना दिली.

जालना गणेश फेस्टिवलची बैठक डॉ. संजय लाखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली येथील शिक्षक पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. याच बैठकीत श्री. आगलावे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बैठकीच्या सुरुवातीला मावळते अध्यक्ष राजेंद्र गोरे यांनी श्री. आगलावे यांचा सत्कार करून त्यांच्याकडे अध्यक्षपदाचा पदभार सोपवला.

यावेळी फेस्टिवलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील, दिनेश फलके, माऊली कदम, अशोक उबाळे, शरद देशमुख, किरण गरड, माजी अध्यक्ष साईनाथ पवार, माजी कार्याध्यक्ष सुरेश मुळे तसेच प्रा. राजेंद्र भोसले, चंद्रशेखर वाळिंबे, रविंद्र हुसे, गणेश सुपारकर, सतीशराव देशमुख, अविनाश भंडे, अनिल व्यवहारे, मधुकर मुळे, संजय देशमुख, राहुल सुपारकर, प्रशांत जिगे, प्रसाद वाढेकर, अजिंक्य घोगरे, दशरथ शिंदे, उदय देशमुख, रोहित देशमुख, धनराज काबलिये, संताजी वाघमारे आदींसह मोठ्या संख्येने गणेशभक्त उपस्थित होते. उपस्थित सदस्यांनी यावेळी आपले विचार मांडून साधक-बाधक चर्चेत सक्रिय सहभाग नोंदवला. शेवटी जगत घुगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. पान २ वर

## महापुरुषांच्या शिकवणीमुळे वाटचाल केल्यास जीवन यशस्वी: आमदार दानवे

### अण्णाभाऊ साठे जयंतीची उत्साहात मिरवणूक

**विशाल देशमुख**
**भोकरदन -** महाराष्ट्राच्या या पवित्र भूमीत विविध जाती-धर्मांचे साधू-संत, थोर महात्मे आणि संशोधक विचारवंत होऊन गेले आहेत. त्यापैकी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांसारख्या महापुरुषांनी व्यक्तीने आपल्या जीवनाची वाटचाल कशी करावी आणि आपले जीवन यशस्वीपणे कसे जगावे याची शिकवण दिली आहे. महापुरुषांनी दाखविलेल्या वाटेने प्रत्येक व्यक्तीने वाटचाल केल्यास जीवन यशस्वीपणे जगता येते आणि ते सार्थक होते, असे प्रतिपादन आमदार संतोष दानवे यांनी केले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकात पुरोगामी विचारवादी, साहित्यरत्न तथा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून आमदार संतोष दानवे उपस्थित होते, तर राज्य उत्पादन शुल्काचे दुय्यम निरीक्षक रमेश विठोरे यांनी प्रमुख वक्ते म्हणून व्याख्यान दिले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक बी.के. जाधव होते. चेअरमन विजयसिंह परिहार, भाजपा तालुकाध्यक्ष नाना भागिले, पोलिस निरीक्षक



सतीश जाधव, नगरसेवक सुरेश दिवटे, सुरेश गवळी, नगरसेवक विजय गोफणे, नगरसेवक अनिल बोर्डे, साहेबराव कानडजे, गजू गोफणे, राजेश गोफणे आदी मान्यवरांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. आमदार संतोष दानवे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी समाजाच्या तळागाळातील शोषित आणि पान २ वर

# संपादकीय

## अनमोल रत्न

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज जन्मदिन. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासह गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटासोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### नवजात बाळांच्या स्वागतासाठी आगळीवेगळी संकल्पना

# 'इंडिया मीडिया लिंक अँड इव्हेंट्स' कडून पर्यावरण रक्षणाचा संदेश

**मुंबई -** इंडिया मीडिया लिंक अँड इव्हेंट्स मॅनेजमेंटच्या वतीने नागपाडा येथील जे. जे. वैद्यकीय अधीक्षक कार्यालय, हॉस्पिटल मोहम्मद अली रोड येथे नवजात बाळांचे आणि त्यांच्या पालकांचे स्वागत करण्यासाठी एक आगळीवेगळी आणि नाविन्यपूर्ण संकल्पना राबवण्यात आली.

या उपक्रमाअंतर्गत नवजात बाळांना आणि त्यांच्या पालकांना एक झाड, टॉवेल, टोपी आणि मिठाई यांचा समावेश असलेले खास बाळाचे स्वागत किट देण्यात आले.या उपक्रमात प्रत्येक नवजात बाळाला हरित शुभेच्छा देत त्यांच्या आयुष्याची सुरुवात एका झाडासोबत जोडली गेली. 'एक बाळ - एक झाड' ही कल्पना प्रत्यक्षात आणत समाजात पर्यावरण जागृती आणि नैसर्गिक संसाधनांचे जतन या उद्दिष्टाने हे पाऊल

उचलण्यात आले.

कार्यक्रमावेळी इंडिया मीडिया लिंक अँड इव्हेंट्स मॅनेजमेंटचे संयोजक के. रवि दादा, मंत्रालयाचे सहसचिव अशोक अत्राम, अभिनेते अली खान, कमल खान, राज्याचे माजी सहसचिव प्रीतम आठवले, समाजसेविका संगीता भाटिया आणि परब यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी के. रवि दादा यांनी पर्यावरण विषयावर मार्मिक भाष्य करत सांगितले की,आपल्या आजूबाजूचं पर्यावरण दिवसेंदिवस धोक्यात येत आहे. देशातील शास्त्रज्ञ वारंवार या संकटाबद्दल इशारे देत आहेत. तरीही झपाट्याने वाढणाऱ्या नागरीकरणामुळे झाडांची बेसुमार तोड सुरू आहे. विशेषतः मुंबईसारख्या शहरांमध्ये झाडं तोडून मोठमोठ्या इमारती उभ्या राहत आहेत. शहराचा विकास गरजेचा असला तरी त्याबरोबर निसर्गाचं नुकसान भविष्यात गंभीर परिणाम घडवू शकतं.

वृक्षतोडीमुळे तापमान वाढतं, हवामान असंतुलित होतं, आणि पावसाचे प्रमाण बदलतं - या सर्व गोष्टी भविष्यातील आपत्तींचं कारण बनू शकतात. म्हणूनच प्रत्येकाने झाडं लावण्याचा, त्यांचे संगोपन



करण्याचा आणि पर्यावरणाचं रक्षण करण्याचा संकल्प केला पाहिजे. हे आपलं सामाजिक कर्तव्य आहे, असे ते म्हणाले.

या अभिनव उपक्रमाने फक्त बाळांचं स्वागतच केलं नाही, तर पर्यावरण रक्षणाचा एक महत्त्वाचा संदेशही दिला. 'एक बाळ - एक झाड' ही संकल्पना भविष्यातील जनगणनेत आणि आरोग्य सेवा उपक्रमांमध्ये देखील समाविष्ट केली जाऊ शकते, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमामुळे सामाजिक कार्य आणि पर्यावरण रक्षण यांचा संगम साधणाऱ्या कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले. नवजात बाळांसाठी झाडाचं रोप हे फक्त एक भेटवस्तू नव्हे, तर भविष्यातील शुद्ध हवेसाठीचा आणि हिरवळीसाठीचा आश्वासक आरंभ आहे.असे सिने अभिनेते अली खान यांनी सांगितले.

कार्यक्रमात 'झाड लावा, झाड वाचवा' हा संदेश देत नवजात बाळांच्या स्वागताचा उपक्रम एक सामाजिक व पर्यावरणीय भान जपणारा प्रेरणादायी पाऊल ठरला.

# लाडक्या बहिणींनो! सरकारच्या अकलेच्या तमाशावर थिरकू नका

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांना आर्थिक मदत पुरवण्यासाठी सुरु केलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढवणे आणि सर्वांगीण विकास साधणे म्हणजेच राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करून कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करणे या उद्दिष्टांचा बनाव करून महाराष्ट्र सरकारने २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी लाडकी बहीण योजना सुरू केली होती.

महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण योजना' निवडणुकीपूर्वी महिलांना भुलवण्यासाठी वापरण्यात आलेले एक षडयंत्र आहे. त्याद्वारे १५००रु हप्ता देण्यात आला. मात्र, निवडणुकीनंतर निधीअभावी हप्ते थकले. योजनेमुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली. यामुळे इतर खात्यांचा निधी वळवला जात आहे. सरकारच्या या आर्थिक कोंडीमुळे लाडक्या बहिणींमध्ये नाराजी असून, २१००रु चा हप्ता तर कोसो दुरच राहिला, पण सध्या १५००रु चाही पत्ता नाही. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत असून सरकार फक्त आश्वासने देत आहे. ही 'लाडकी बहीण योजना' फक्त निवडणुकीसाठी वापरलेला फसवणुकीचा प्रकार आहे, असं म्हणायला हरकत नाही.

सध्या महायुती सरकारमधील तिन्ही भावांना लाडक्या बहिणींचा विसर पडल्याचं दिसून येत आहे. मे आणि जून महिन्याचा हप्ता काही लाडक्या बहिणींना अद्याप मिळालेला नाही, असं लाडक्या बहिणींची ओरड सुरु आहे. योजनेच्या तांत्रिक बाबींमुळे बहिणींच्या खात्यात हप्ता येणे थकले आहे. आता, ज्यांच्या कौटुंबिक उत्पन्नात वार्षिक एक लाख रुपये येतात, त्यांना या योजनेतून वगळण्यात येईल असे म्हणतात. तुम्ही कोणतंही काम कराल तरी महिन्याला दहा हजार रुपये इतका पगार मिळतोच आणि प्रत्येक कुटुंबात एखादा तरी दहा हजार रुपये कमावणारा असतोच असतो. म्हणजे 'काम झालं माझं आणि काय करू तुझं' या उक्तीप्रमाणे इतर निकषांच्या आधारे कित्येक लाडक्या बहिणींना वगळण्याचा प्लॉन आहे. यावरून सिद्ध होते की, ही 'लाडकी बहीण योजना' फक्त निवडणुकीसाठी वापरलेला फसवणुकीचा प्रकार होता.

दुस-या राज्याची संकल्पना उचलून महाराष्ट्रात महायुती सरकारने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात 'लाडकी बहीण योजना' जाहीर केली आणि विधानसभा निवडणुकीच्या काही महिने आधी राज्यभरातील बहिणींना ३ महिन्यांचे प्रत्येकी १५००रु प्रमाणे ४५००रु खात्यात देऊन लाडक्या बहिणींच्या मतांची भाऊबीज आपल्या ओंजळीत घेतली. पण हीच 'लाडकी बहीण योजना' आता पुन्हा निवडून आल्यावर राज्य सरकारला महागात पडत आहे. या योजनेद्वारे सुमारे दीड कोटी बहिणींना निधी वाटण्यात आला आणि नंतर कळले की निकषात न बसणा-या बहिणींनाही हा निधी घेण्याचा मोह आवरला नाही. त्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली. सध्या राज्याची आर्थिक अवस्था 'आमदनी अठ्ठनी खर्चा रुपया' अशी झाली आहे.

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल अर्थसंकल्प अधिवेशनाच्या काळात विधिमंडळात मांडला. या अहवालात लाडकी बहीण योजनेची माहिती देण्यात आली. या योजनेत जून २०२४ पासून डिसेंबर २०२४ या ७ महिन्याच्या कालावधीत २ कोटी ३८ लाख लाभार्थी बहिणींना निधी देण्यात आला. हा निधी तब्बल १७,५०५ कोटी रुपये इतका होता.

'लाडकी बहीण योजना' ऐन निवडणुकीच्या तोंडावर जाहीर केल्यामुळे सरकारने होता नव्हता निधी वापरला. मात्र, पुन्हा निवडून आल्यावर काय करायचे? याचा विचार बहुधा केला गेला नाही. त्यातच पुन्हा सरकार यावे या हेतुने १५००रु चा हप्ता थेट २१००रु करण्याचे आश्वासन दिले आणि महायुती सरकार मोकळे झाले. राज्यातील बहिणींनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना पुन्हा निवडून दिले. त्यानंतर मात्र महायुती सरकारची पंचायत होऊ लागली. या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूदच केलेली नव्हती. मग काय, आर्थिक ताळमेळ बसवण्यासाठी इतर खात्यातील निधी वळवण्याची व पळवण्याची वेळ आली. लाडक्या बहिणींना एप्रिल महिन्याचा हप्ता ७ मे दरम्यान देण्यात आला होता. आता, मे ते जुलै महिन्याचे ४५००रु कधी मिळणार, याची प्रतिक्षा आहे. दरम्यान, अर्थमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेत चूक झाल्याचे जाहीर केले. त्यामुळे निधी मिळणार की नाही, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. लाडकी बहीण योजनेत १५००रु चा हप्ता २१००रु कधी होणार हे तर दुरच राहिले. आता १५००रू तरी मिळणार की नाही, असा प्रश्न लाभार्थी बहिणींना पडत आहे.

राज्यासमोर आर्थिक संकट वाढत आहे. महसुली उत्पन्नापेक्षा खर्च जास्त आहे. कर्ज व व्याजापोटी मोठी रक्कम खर्च होत आहे. भांडवली खर्चासाठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही. आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवालातून राज्याची गंभीर स्थिती समोर आली आहे. म्हणजे खर्चाच्या तुलनेत उत्पन्न कमी आहे. कर्ज आणि व्याजापोटी राज्यावरील कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. यामुळे खर्च भागवताना अडचणी येत आहे. दरम्यान, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सरकारी कर्मचा-यांना लाभ बंद केल्याबाबतची माहिती दिली. ५ महिन्यांपूर्वी लक्षात आले की सरकारी महिला कर्मचारी लाभ घेत आहेत. त्यामुळे त्यांना बंदी घालण्यात आली. आता तर महिला आणि बालविकास विभागाने केलेल्या ऑडिटमध्ये असे आढळून आले आहे की, लाडकी बहीण योजनेअंतर्गत १४,००० हून अधिक पुरुषांनी फसवणूक करून आर्थिक लाभ मिळवले आहेत. ऑडिटमध्ये असे म्हटले आहे की या योजनेअंतर्गत १४,२९८ पुरुषांना २१.४४ कोटी रुपये वितरित करण्यात आले. पण जेव्हा सरकारी महिला कर्मचारी आणि पुरुष लाभ घेत होते, तेव्हा निकष तपासणारे काय करत होते? त्यामुळे या पुरुषांवर कार्यवाही होणार का आणि त्यांच्याकडून दिलेली रक्कम वसूल करण्यात येईल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. आतापर्यंत सर्वच निकषांच्या आधारे अर्जाची पडताळणी सुरू होती. त्यामुळे जवळपास ५० लाख बहिणींना वगळण्यात आले. ही पडताळणी पुढेही सुरू ठेवली असती, पण येणा-या मनपा, नप, जिप, पंस व ग्रापं निवडणुकीचा विचार करता ही प्रक्रिया तात्पुरती बंद करण्यात आली. एवढेच नव्हे तर रक्षाबंधनचे औचित्य साधून ज्या बहिणींचे मे पासूनचे हप्ते थकले, त्यांना मे ते ऑगस्ट असे ४ महिन्यांचे प्रत्येकी १५००रु प्रमाणे ६०००रु तर चालू बहिणींना जुलै व ऑगस्ट असे २ महिन्यांचे प्रत्येकी १५००रु प्रमाणे ३०००रु देऊन आमिषांच्या षडयंत्रात अडकवण्याचा प्रयत्न सुरु आहे. परंतु लाडक्या बहिणींच्याही आता लक्षात येऊ लागले आहे की, हे महायुतीचे सरकार फसवे आहे. म्हणून लाडक्या बहिणींनो सरकार कोणतीही अक्कल लढविली, तरी त्यांच्या अकलेच्या तमाशावर थिरकू नका आणि त्यांच्या चक्रव्युहात अडकू नका.

तसं पाहता महायुती सरकारमध्ये जनतेला फेस करण्याची ताकद उरली नाही. म्हणूनच तर जन सुरक्षा विधेयक पारीत करून सामान्य जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा व सर्वाधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. पण लाडक्या बहिणींनो तुमच्यात हे विधेयक हाणून पाडण्याची ताकद आहे. त्यामुळे ते पारीत होण्यापूर्वीच हाणून पाडा. एकदा का हे विधेयक पारीत झाले तर मग कोणत्याच गोष्टीसाठी तुम्ही लढू शकणार नाही. त्यामुळे आताच जागे व्हा, उठा आणि लढा..!

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमनध्वनी-७०५७१८५४७९**

पान १ व ४ वरुन

## ऑनलाईन गेमिंग ...

आहोत. नागरिकांनीही आपल्या घरातील मुलांवर लक्ष ठेवावे, त्यांचे मोबाईल व्यवहार तपासावेत व समाजात जनजागृती करावी. याबाबत आपल जिल्ह्यात जनजागृती मोहीम राबविणे सुरू केले असून, नागरिकांनीही यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन ॲड. अश्विनी धन्नावत यांनी केले आहे.

**२१७९ कोटींचा ...** किलो घट होईल. हा पर्यावरणपूरक फायदा २० कोटी वृक्षारोपणाच्या परिणामांशी तुलना करता येईल. **'गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन'चा भाग:**
हे सर्व प्रकल्प पंतप्रधान मोदींच्या संकल्पनेतील 'पीएम गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन' (झच् ऋींळडहरज्ञींळ छर्रींळेपरश्र चरीींशी झश्ररप) अंतर्गत राबवले जात आहेत. याचा मुख्य उद्देश देशातील मल्टिमोडल कनेक्टिव्हिटी आणि लॉजिस्टिक कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ करणे हा आहे.
**खासदार डॉ. कल्याण काळे यांचे लक्षणीय योगदान:**
खासदार डॉ. कल्याण काळे यांनी निवडून आल्यानंतर सातत्याने छत्रपती संभाजीनगर-परभणी मार्गाच्या दुहेरीकरणासाठी पाठपुरावा केला. त्यांनी संसदेत आणि मंत्रालयात ही गरज ठामपणे मांडून रेल्वे मंत्रालयाच्या धोरणनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली. आज त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचे हे ठोस फलित जनतेला दिसून येत आहे. हा निर्णय मराठवाड्याच्या दृष्टीने एक मैलाचा दगड असून, या भागातील सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासाला नवी दिशा देणारा ठरेल. खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या नेतृत्वातील लोकाभिमुख विकासाचा हा एक ठोस पुरावा आहे.

## जालना गणेश ...

पुढे बोलताना नूतन अध्यक्ष अशोकराव आगलावे म्हणाले की, आपणा सर्वांच्या सहकार्याने ही जबाबदारी पार पाडण्यात आपण निश्चितच यशस्वी होऊ, यात शंका नाही. यंदाही अत्यंत उत्कृष्ट आणि दर्जेदार कार्यक्रमांची मेजवानी गणेश भक्तांना देण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे. आपणा सर्वांची साथ आणि गणपती बाप्पाचे आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत, असेही श्री. आगलावे यांनी शेवटी नमूद केले. त्यांच्या या निवडीमुळे जालना गणेश फेस्टिवलच्या आयोजनाला आता गती येणार असून, शहरातील गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महापुरुषांच्या शिकवणीमुळे ...

वंचित माणसांना स्थान दिले. त्यांना नायक म्हणून उभे केले. त्यांच्या महिलांवरील लिखाणामुळे स्त्रिया अन्यायाविरुद्ध पेटून उठतात आणि न्यायासाठी संघर्ष करतात, असेही ते म्हणाले.
**शहरातून काढण्यात आली भव्य रॅली; कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग**
सायंकाळी शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे पूजन करून रॅलीला सुरुवात करण्यात आली. ही रॅली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, संविधान मार्गे एपीजे अब्दुल कलाम चौक, राष्ट्रमाता जिजाऊ चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक या प्रमुख ठिकाणांवरून काढण्यात आली. यावेळी रॅलीमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे शाहिरी पोवाडे तसेच देशभक्तीपर आणि विविध गीतांवर तरुणाईने ठेका धरला होता. कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असल्याने रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.
**संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान** अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान मोठे आहे. त्यांनी त्यांच्या जीवनात विविध कला जोपासल्या होत्या. एक अष्टपैलू व्यक्तिमत्व या देशाने पाहिले असून, अण्णाभाऊ साठे यांचे विचार प्रेरणादायी असल्याचेही आमदार दानवे यांनी सांगितले. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात विज्ञानवादी आणि परिवर्तनवादी सकारात्मक आधुनिक दृष्टिकोन दिसून येतो. त्यांचे साहित्य जगण्यास ऊर्जा देते. त्यांनी मानवतेचे अनुभव प्रभावी आणि धारदार लेखनातून मांडले, असेही याप्रसंगी नमूद करण्यात आले.

## डिजिटल अरेस्ट ...

नंबर सेव्ह करून ठेवू नयेत. कदाचित मोबाईल हरवल्यास खाते स्टॉप करण्यास अडचणी येतात आणि आणि गुन्हेगार या मोबाईलमधील माहितीच्या आधारे आपले खाते रिकामे करू शकतात. आज-काल एटीएम मधून कोणीच पैसे काढत नाहीत. किमान दोन-तीन महिन्याला थोडे का होईना काढायला पाहिजे. कारण एटीएम कार्डवर इन्शुरन्स असतो. मात्र वर्षानुवर्ष ते न वापरल्यास इन्शुरन्सचा फायदा मिळत नाही. फ्रॉड कॉलची खात्री झाल्यानंतर तो कट करून टाकावा. त्यावर बोलू नये. या आवाजाचा एआय पद्धतीने वापर करून ब्लॅकमेलिंगसारखे प्रकार घडू शकतात, असे ते म्हणाले. यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना पोलीस उपनिरीक्षक योगेश चव्हाण आणि संदीप मांटे यांनी खुलासेवार उत्तरे देऊन शंका समाधान केले. प्रास्ताविकात वर्षा पिती म्हणाल्या की, सायबर फसवणुकीविषयी जागरूकता निर्माण करून नागरिकांना या सापळ्यातून वाचवणे हा या कार्यक्रमामागील उद्देश आहे. जनतेने फसवणुकीपासून सावध राहून सजग नागरिक म्हणून जबाबदारी पार पाडावी असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील व्यावसायिक, व्यापारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सायबर सुरक्षेचे महत्व समजून घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प प्रमुख सीए अंबेश बियानी आणि प्रशांत महाजन यांनी विशेष परिश्रम घेतले.

## इंदेवाडी पाणी ...

नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल कोल्हे यांनी केले, तर प्रास्ताविक प्रमोद पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुखदेव पाटील भुम्बर, विष्णू एडके, विजय इंगळे, सुरेश मदन, औदुंबर मातने, विष्णू मानकर, राम राठोड यांसह परिसरातील नागरिकांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत विरोधकांना जागा दाखवणार - विनोद घोसाळकर

**मंठा । प्रतिनिधी -** हिंदुरुदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी एकनिष्ठ राहून, शिवसैनिक पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्यावर विश्वास ठेवून येत्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये विरोधकांना त्यांची खरी जागा दाखवतील, असे मत शिवसेना (उबाठा) संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर यांनी व्यक्त केले. मंठा तालुक्यातील कोकरसा येथे आयोजित मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी शिवसैनिकांना एकजुटीने आणि जोमाने कामाला लागण्याचे आवाहन केले.

या मेळाव्यास शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले, जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, माजी आमदार संतोष सांबरे, जिल्हाप्रमुख महेश नळगे, उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम, तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, युवासेना जिल्हाप्रमुख गणेशराव काळे, उपजिल्हाप्रमुख अशोकराव आघाव, विजयराव जाधव, तालुका संघटक ज्ञानेश्वर सरकटे, युवासेना तालुकाप्रमुख डिगांबर बोराडे, उप तालुकाप्रमुख संजय नागरे, उप तालुकाप्रमुख देविदास खरात, युवासेना उपजिल्हाप्रमुख संदीप सरकटे, युवासेना तालुकाप्रमुख गोरख चव्हाण, अनंतराव वैद्य, आसाराम बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.




आपल्या भाषणात घोसाळकर म्हणाले की, स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत शिवसेना पक्षाची स्थापना करून त्यांचे विचार महाराष्ट्रभर रुजवले. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आज पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांनी पुन्हा पक्ष वाढीसाठी जोमाने प्रयत्न सुरू केले आहेत. युवा नेते आदित्य ठाकरे यांच्या सहकार्यातून युवकांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका लढवण्याची संधी मिळाली आहे. आले किती गेले किती संपले भरया. तरी तुझ्या नामाचा अजुनी दरारा या बजरंगबलीच्या गीतातील ओवीचा संदर्भ देत ते म्हणाले की, पक्षातून कितीही गद्दार गेले असले तरी स्व. बाळासाहेबांचे विचार आजही जिवंत आहेत, त्यामुळे शिवसेना पक्ष कधीही संपू शकत नाही. याची जाणीव विरोधकांना येत्या निवडणुकांमधून करून देण्याची वेळ आली आहे. यासाठी शिवसैनिकांनी एकत्रित येऊन जोमाने कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले आणि माजी आमदार संतोष सांबरे यांनीही उपस्थित शिवसैनिकांना मार्गदर्शन केले. शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले यांनी जोर देऊन सांगितले की, कार्यकर्ता हा पक्षाचा आत्मा आहे. युवकांना पक्षात मोठी संधी निर्माण झाली आहे. त्यासाठी शिवसैनिकांनी गावागावात पक्षाची नव्याने उभारणी करण्यासाठी 'गाव तिथे शाखा' अभियान राबवून शिवसेना पक्षाचे विचार घराघरापर्यंत पोहोचवण्यासाठी जोमाने कामाला लागावे.

या मेळाव्यात जिल्हाप्रमुख महेश नळगे आणि तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तालुक्यातील दहा, दहा तांडा आणि कोकरसा येथे शिवसेना पक्षाच्या शाखांची स्थापना करण्यात आली. या मेळाव्यात देवगाव खवणे येथील सरपंच डॉ. संदीप मोरे, जयपूर येथील सिद्धेश्वर काकडे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर काकडे, जीवन चिंतामणी, महादेव खवने, बबनराव साळवे, संतोष खवणे, प्रकाश दाहिजे, योगेश लोमटे, मारुती लोमटे, बाबासाहेब लोमटे, अमोल लोमटे, राजेश लोमटे, विजय लोमटे, सोमनाथ घुगे, भगवानराव देशमुख, आयुब सय्यद यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी शिवसेना (उबाठा) पक्षात प्रवेश केला. या मेळाव्यास विभाग प्रमुख शिवाजीराव मोरे, विजयराव दवणे, श्रीकृष्ण पवार, सचिन चव्हाण, इम्रान पठाण, निलेश बोराडे, अशोक खंदारे, बाळासाहेब वैद्य, विजय दवणे, नवनाथ नाईक, रितिक जाधव यांच्यासह परिसरातील हजारो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# कराटे बेल्ट वितरण सोहळा जालना येथे संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा शाईन कराटे-डु संस्थेतर्फे नुकत्याच घेण्यात आलेल्या कराटे बेल्ट परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी कराटे बेल्ट वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना बेल्ट आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला श्री. श्रेयश मुथा अध्यक्षस्थानी होते, तर नारायणा ई टेक्नो शाळेचे ॲकॅडमिक डीन श्री. व्यंकट राजू गुंडला आणि मार्कंडेय एजन्सीचे ओनर श्री. गणेश चिप्पा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या परीक्षेत ब्लॅक बेल्ट कु. समृद्धी भालेराव आणि कु. तेजल भागडे यांना, तर ब्राऊन बेल्ट सेकंड कु. तन्वी खरटमल, कु. अश्विनी आजगे, कु. लावण्या गुडला, कु. दिव्यता कोठारी, कु. पूर्वा माने आणि कु. आरुषी वलकट्टी यांना प्रदान करण्यात आले. तसेच, शेलमोन गुडेकर याला ब्राऊन बेल्ट फर्स्ट मिळाला.

इतर यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये ब्ल्यू बेल्ट, ग्रीन बेल्ट, ऑरेंज बेल्ट आणि येलो बेल्ट मिळवणाऱ्यांचा समावेश आहे. सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा आणि सेन्साई अमन रुपेन्द्र पारचा यांनी या सर्व विद्यार्थ्यांना कराटेचे प्रशिक्षण दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पूर्वा सुजित माने हिने केले, तर आभार प्रदर्शन सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री म. स्था. जैन प्राथमिक विद्यालय व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक आणि पालक वर्गाकडून कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# गावकरी, पत्रकारांचे सहकार्य विसरता येणार नाही - सपोनी सचिन खामगळ



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** पोलिस दलात उत्कृष्ट सेवा बजावल्याबद्दल सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन खामगळ यांची जालना येथील स्थानिक गुन्हे शाखेत बदली झाली आहे. या निमित्ताने टेंभुर्णी पोलिस ठाण्यात त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी खामगळ यांनी, सर्वांच्या सहकार्याने कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम चोखपणे करता आल्याचे समाधान वाटते, असे प्रतिपादन केले.

खामगळ यांची टेंभुर्णीतील कामगिरी गेल्या दोन वर्षांत खामगळ यांनी टेंभुर्णी पोलिस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था उत्तम प्रकारे राखली. त्यांनी अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी उत्कृष्ट कामगिरी केली आणि जनमानसात विश्वास निर्माण केला. त्यांच्या कार्यकाळात खुनाचा एकही गुन्हा (कलम ३०२) दाखल झाला नाही. दाखल झालेले गुन्हे त्वरित तपासात घेऊन त्यांनी गुन्हेगारांवर कडक कारवाई करत शांतता प्रस्थापित केली, ज्यामुळे ते गुन्हेगारांचे कर्दनकाळ ठरले.

विशेष सन्मान पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या २३६ गुन्ह्यांपैकी १७२ गुन्ह्यांचा निपटारा केल्याबद्दल छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांच्या हस्ते खामगळ यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला होता. नवीन अधिकाऱ्याचे स्वागत आणि उपस्थित मान्यवर याच कार्यक्रमात बदलीने टेंभुर्णी पोलिस ठाण्यात आलेले सहाय्यक पोलिस निरीक्षक कैलास भारती यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब खार्डे, पि.जी. तांबेकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष रामधन कळंबे, उद्धव दुनगहू, भारतीय जनता युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष विजय परिहार, दत्तु पंडित, गौतम मस्के, लक्ष्मण शिंदे, विष्णू जमधडे, फैसल चाऊस यांच्यासह अनेक पोलिस कर्मचारी आणि टेंभुर्णी परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक कैलास भारती, रामधन कळंबे, संजय राऊत, रावसाहेब अंभोरे, गौतम म्हस्के आणि फैसल चाऊस यांनी भाषणे दिली.

## अहिल्यादेवी प्राथमिक विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** अहिल्यादेवी प्राथमिक विद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विशाल देशमुख यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमादरम्यान, विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याविषयी माहिती देणारी भाषणे दिली. याप्रसंगी अनेक पालक आवर्जून उपस्थित होते. मुख्याध्यापिका श्रीमती इंगळे यांनी उपस्थितांना 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाची माहिती दिली. तसेच, विद्यार्थ्यांची १००% उपस्थिती, गुणवत्ता वाढीसाठी सुरू असलेले प्रयत्न, मूल्यमापन पद्धती, शाळेतील सखी-सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती आणि इतर सर्व समित्यांच्या कार्यपद्धतीवर सविस्तर माहिती दिली आणि त्यावर चर्चाही केली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद, श्रीमती शारदा सद्गुरे, शुभांगी लामधाडे, दुर्गा घुले, श्री मदन कुरधने आणि श्री शिवाजी घोगरे यांनी विशेष प्रयत्न केले.

# संस्कृत भाषेच्या अध्ययनाने संस्कृती टिकून राहिल - रविंद्र जोशी

## संस्कृत स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद, ३२८ विद्यार्थ्यांचा सहभाग



**जालना । प्रतिनिधी -** सध्या विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण उत्तम असले तरी, पाश्चात्त्य संस्कृतीच्या आक्रमणामुळे आपली संस्कृती लोप पावत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषेच्या अध्ययनाने आपली संस्कृती टिकून राहिल, असे प्रतिपादन जालना जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी रविंद्र जोशी यांनी केले. श्रीराम संस्कृत विद्यालय (पाठशाळा), ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय आणि अखिल भारतीय शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठान, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत दिनानिमित्ताने दिनांक ०२/०८/२०२५ रोजी आयोजित शालेय संस्कृत पाठांतर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय व ग्रंथालय भारतीचे अध्यक्ष कैलास बियाणी यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून जालना येथील प्रियदर्शनी नागरी सहकारी बँकेचे संचालक सीए नितीन तोतला, नायब तहसीलदार शिवाजी गारोळे, संस्कृत शिक्षिका व संस्कृत भाषा प्रचार समिती, जालनाच्या उपाध्यक्षा जयश्री कुलकर्णी, संस्कृत शिक्षिका कीर्ती कागबट्टे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती देवीचे पूजन करून दीपप्रज्वलनाने स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. रविंद्र जोशी पुढे म्हणाले की, श्रीराम संस्कृत विद्यालयामार्फत आयोजित शालेय संस्कृत स्पर्धेचे वातावरण पाहून मन प्रसन्न झाले. संस्कृत भाषेच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांचे व्याकरण चांगले होते, उच्चार स्पष्ट होतात आणि बुद्धिमत्ता तीक्ष्ण होण्यास मदत होते. मी एक जबाबदार अधिकारी म्हणून संस्कृत भाषेच्या विकासासाठी शासन दरबारी नक्कीच पाठपुरावा करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

नितीन तोतला यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मला संस्कृत भाषेची आवड होती, परंतु संस्कृत भाषा शिकायला मिळाली नाही याची खंत त्यांनी व्यक्त केली. आपली वेद-पुराणे संस्कृत भाषेत असल्यामुळे संस्कृत भाषा शिकणे आवश्यक आहे. मी कित्येक वर्षांपासून जालना शहरात राहत आहे, परंतु शहरात एक उत्तम प्रकारचे संस्कृत विद्यालय व वाचनालय पाहून मन प्रसन्न झाले.

लक्ष्मीकांत कंकाळ म्हणाले की, मी १९५१ चा श्रीराम संस्कृत विद्यालयाचा विद्यार्थी आहे. रोज संध्याकाळ झाली की संस्कृत शिकण्याची ओढ लागायची. विद्यालय व वाचनालयामार्फत संस्कृत भाषेचा प्रचार-प्रसार पाहून मन आनंदित झाले. यापुढे जेष्ठ नागरिक मंचच्या सदस्यांना वाचनालयात वाचनासाठी येण्यासाठी मी प्रोत्साहन देईल

अध्यक्षीय समारोप करताना कैलास बियाणी म्हणाले की, संस्कृत स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषेची आवड निर्माण होऊन ते संस्कृत भाषा शिकल्याने नवीन संशोधन करू शकतील.

दिनांक ०६ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी या वर्गासाठी घेण्यात येणाऱ्या या स्पर्धेसाठी एकूण ३२८ शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. विशेष म्हणजे, शिवाजी गारोळे यांची पदोन्नतीने नायब तहसीलदार पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा याप्रसंगी विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार शैलेंद्र बदनापुरकर यांनी मानले. याप्रसंगी शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधाकर भालेराव, मनोहर कुलकर्णी, ज्येष्ठ नागरिक मंचचे संस्थापक-लक्ष्मीकांत कंकाळ, अध्यक्ष- तुळशीराम शेळके, विशाल लताड, दिलीप कुलकर्णी, हिरालाल पिपरीये, रमेश देहडकर, नितीन बावणे, अभिजीत शेंडगे, रेणुका गुलापेल्ली, नंदकुमार सानप, नंदकुमार मुरगे, अनघा भावठाणकर, पद्मिनी कुलकर्णी, अमोल कुलकर्णी, विपुल धोतरे यांसह पालक, संस्कृत शिक्षक आणि वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



**जिल्हाधिकारी कार्यालयात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार तुषार निकम, संदीप डोंगरे, श्रीमती दिपाली राऊत, श्री.दाभाडे आदींची उपस्थिती होती**

छत्रपती शिवाजी महाराज नगर मधील मारुती मंदिर परिसरातील सी.सी. रोडचे उदघाटन

# मारुती मंदिरातील मोकळ्या जागेत नाना-नानी पार्कची निर्मिती करणार - मोहन अग्रवाल

**परतुर । प्रतिनिधी -** शहरातील मोंढा भागातील छत्रपती शिवाजी महाराज नगर परिसरातील सी.सी. रस्त्याच्या विकास कामाचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज नगरातील नागरिकांनी मोहन अग्रवाल यांचा व सोबत असलेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला सत्कारास उत्तर देताना अग्रवाल म्हणाले की, परतूर शहरातील विविध भागात सिमेंट कॉंक्रेट रोड व नाल्या बऱ्याच ठिकाणी नाहीत, व आहे त्या ठिकाणचे सिमेंट रस्त्यांचे दुरावस्था झालेली आहे ,ठिकठिकाणी खड्डे पडलेले आहेत, नाल्याचे घाण पाणी रस्त्यावर येण्याचे प्रमाण अधिक असून मी आपणास आश्वासित करतो की एकही भाग एकही गल्ली विकासापासून वंचित राहणार नाही, तसेच छत्रपती शिवाजी महाराज नगरातील मारुती मंदिरतील मोकळ्या जागेत ज्येष्ठ नागरिकांसाठी नाना नानी पार्क ,लहान मुलांना खेळण्यासाठी घसरगुंड्या विविध खेळणी साहित्य उपलब्ध करून देणार असे आश्वासन या ठिकाणी अग्रवाल यांनी दिले तसेच शहरातील विविध प्रभागातील विकास कामे नागरी सुविधा पुरविल्या शिवाय शांत बसणार नाही ,तसेच माझ्या माध्यमातून छत्रपती शिवाजीनगर परिसरामध्ये मारुती मंदिर ठिकाणी दोन सभा मंडप व सी सी रस्ते असे एकूण ५० लक्ष रुपयाचे कामे करण्यात आलेले आहेत, आणि मारुती मंदिर परिसरातील मोकळ्या जागेत भविष्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी नाना नानी पार्कची निर्मिती करण्यात येईल असे अग्रवाल यांनी शेवटी सांगितले. विविध रस्ते व विकास कामे माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर करण्यात आलेले असून या वेळी तालुकाप्रमुख अमोल सुरुंग, विधानसभा संघटक विजयकुमार गिरी, शहर प्रमुख दीपक हिवाळे, युवा सेना शहर प्रमुख प्रणय मोर, डॉ. शेळके, श्री महाजन , श्री टेकाळे ,सुरेशराव एकिवाले, उद्धवराव माने ,श्री कल्याणकर,श्री तनपुरे ,नागनाथ आप्पा ढवळे ,सुनील ढगे ,श्रीहरी ढगे, त्र्यंबकराव मुंडे ,ओम कानडे, वैजनाथराव तनपुरे, श्री देवते, शेख फेरोज ,आप्पासाहेब चांदर ,दीपक मानकर ,व्ही आर सारस्वत, व आदी नागरिकांची मोठ्या प्रमाणात उद्घाटनाप्रसंगी उपस्थिती होती.तसेच परतूर शहरातील सी. सी. रस्ते ,सि सी नाल्या ,४० फुटी विद्युत खांब,स्पीड ब्रेकर, भूमिगत गटारे आणि सभा मंडप असे जवळपास आज पर्यंत परतूर शहरात २८ कोटी रुपयांची विकासाची कामे माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आली आहेत.



# ‘डिजिटल अरेस्ट’ या सायबर गुन्हेगारीतील फसवणुकीपासून सतर्क रहा - योगेश चव्हाण

## रोटरीच्या कार्यक्रमात व्यावसायिक आणि नागरिकांनी समजून घेतले सायबर सुरक्षेचे महत्व

**जालना । प्रतिनिधी -** डिजिटल अरेस्ट नावाने सध्या एक नविन प्रकारची सायबर फसवणूक सुरू आहे. सायबर गुन्हेगारीतील एक नविन पण अतिशय धोकादायक असलेल्या या फसवणुकीला अनेकजण बळी पडतात. मात्र, अनेकजण तक्रारी करत नाहीत. अशा गुन्ह्यात न्याय आणि लुबाडलेली रक्कम परत मिळून देण्यासाठी स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित आहे. नागरिकांनी अशा फसवणुकीपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी सतर्क राहावे, असे आवाहन सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक योगेश चव्हाण यांनी येथे बोलताना केले.

सध्या डिजिटल अरेस्ट या नव्या सायबर फसवणुकीच्या प्रकारामुळे नागरिकांना गंडा घालण्याचे प्रकार वाढत आहेत. या प्रकाराविषयी जनजागृती करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे शनिवार दि. २ ऑगस्ट रोजी हॉटेल मधुबनच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक योगेश चव्हाण आणि पोलीस अंमलदार संदीप मांटे यांनी व्यापारी, उद्योजक आणि नागरिकांना अत्यंत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. व्यासपीठावर क्लबच्या अध्यक्षा सौ. वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत यांची उपस्थिती होती. योगेश चव्हाण म्हणाले की, डिजिटल अरेस्ट प्रकारात सायबर गुन्हेगार स्वतःला केंद्रीय तपास संस्था, पोलिस अधिकारी, बँकेचे तसेच अन्य अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांना व्हिडीओ कॉल, ई-मेल किंवा फोनद्वारे धमकावतात. तुमचा मनी लॉन्डरिंग, ड्रग्स प्रकरणात सहभाग आहे, तुमच्यावर गंभीर गुन्हा दाखल झाला आहे आणि त्यासाठी तुमचे अरेस्ट ऑर्डर निघाले आहे, अशा प्रकारचे आरोप लावून त्यांच्याकडून बँक तपशील, ओटीपी किंवा ऑनलाईन व्यवहाराद्वारे पैसे उकळण्याचा प्रयत्न केला जातो. काही प्रकारात तुमचं बँक खातं गोठवलं जाणार आहे, अटक वॉरंट निघालंय असं सांगतात. तुम्हाला सतत व्हिडीओ कॉलवर राहण्यास भाग पाडून मानसिक दबाव आणतात




आणि भीतीच्या वातावरणात नागरिक पैसे ट्रान्सफर करतात. डिजिटल अरेस्ट हा एक बनावट प्रकार असून, पोलिस किंवा सरकारी संस्था कधीही अशा पद्धतीने अटक करत नाहीत, असे श्री. चव्हाण यांनी स्पष्ट केले.

अनोळखी नंबरवरून येणारे कॉल्स, ईमेल्स, व्हॉट्सऍप मेसेजेस अथवा सोशल मीडियावरून आलेल्या लिंक्सवर कधीही विश्वास ठेवू नये. कोणतीही आर्थिक देवाणघेवाण करण्यापूर्वी त्या व्यक्तीची खात्री करणे अत्यावश्यक आहे. सोशल मीडियावरील व्यवहार करताना ’टू स्टेप व्हेरिफिकेशन’ सुरू ठेवावे, जेणेकरून तुमचे अकाउंट सुरक्षित राहील. अनेक वेळा लोक ऑनलाइन व्यवहार करताना रजिस्टर नसलेल्या प्सवर गुंतवणूक करतात, जी पुढे फसवणुकीचे साधन ठरते. क्रिप्टो अथवा इतर फायनान्शियल व्यवहार करताना अधिकृत व सुरक्षित प्लॅटफॉर्म वापरणे आवश्यक आहे. जर सायबर फसवणूक झालीच, तर तातडीने १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधावा किंवा जवळच्या सायबर सेलमध्ये तक्रार द्यावी. बँकेलाही त्वरित माहिती द्यावी, जेणेकरून पुढील नुकसान रोखता येईल, असे श्री. चव्हाण म्हणाले. यावेळी पोलीस अंमलदार संदीप मांटे म्हणाले की, बँकिंग व्यवहारासाठींचे प्स गुगलवरून न घेता प्ले स्टोरवरूनच डाऊनलोड करावेत. शक्यतो बँकेतूनच प्स ची लिंक मिळवावी. आजघडीला ऑनलाइन व्यवहारामुळे बँक आपल्या खिशात आहे. मोबाईलमध्ये महत्वाचे दस्तऐवज जसे यूपीआय पासवर्ड, पॅन व आधार

पान २ वर

## इंदेवाडी पाणी टाकी ते गोकुळधाम सोसायटी रस्त्याचा प्रश्न तातडीने सोडवणार! - आमदार अर्जुन खोतकर



**जालना । प्रतिनिधी -** इंदेवाडी येथील गणपती नगर, मातोश्री नगर, गोकुळधाम सोसायटी, जीआयएस क्वार्टर सोसायटी, शिवनेरी कॉलनी, बंजारा कॉलनी, जय भोलेश्वर नगर, अष्टविनायक नगर, ओंकारेश्वर नगर, हनुमान नगर, समर्थ नगर, चाळगे नगर, शिवदत्त नगर, संघर्ष नगर इत्यादी परिसरातील नागरिकांनी आमदार अर्जुनराव खोतकर साहेब यांचा विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमताने निवडून आल्याबद्दल भव्य नागरी सत्कार रविवार दिनांक ३ रोजी इंदेवाडी येथे आयोजित केला होता.

यावेळी नागरिकांनी परिसरातील समस्यांची आमदार खोतकर यांना जाणीव करून दिली, तसेच येथील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी नागरिकांनी त्यांना निवेदन दिले. यावर बोलताना आमदार खोतकर यांनी, आपण या समस्येसाठी तातडीने लक्ष घालून लवकरात लवकर या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावू, तसेच रस्त्याचा प्रश्न सोडवल्याशिवाय पुन्हा मतं मागण्यास येणार नाही, असे आश्वासन यावेळी दिले.

यावेळी किशोर पांगारकर, सुमित वाघमारे, श्रीमती रेखाताई तौर, श्रीकृष्ण पांडव, बाळासाहेब बोंदरवाल इत्यादी उपस्थित होते. या सत्कार समारंभास परिसरातील

पान २ वर




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.